Yashwant Shikshan Sanstha's

# MIRAJ MAHAVIDYALAYA, MIRAJ

(Arts, Commerce & Science)

◆ J. 22-08-022 ◆ UDISE No. 27351001819 ◆

NAAC 'B' Grade 2019

795/1/A, Budhgaonkar Mala, Near Govt. Milk Dairy,
Miraj - 416 410. Tel.: (0233) 2211919.
Email : mirajmahavidyalayamiraj@gmail.com
Web.: www.miraj_mahavidyalaya.org.in



Junior College

# Prospectus

2023-24

– प्रवेश अर्ज : १० रु.

– माहिती पत्रक : ४० रु.



## यशवंत शिक्षण संस्था, सांगली-कुपवाड संचलित

### विविध शाखा

| | |
|---|---|
| दे.भ. आर.पी.पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कुपवाड. | (0233) 2346804 |
| स्वातंत्र्यवीर ने.स.चौगुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, भोसे. | (0233) 2257248 |
| श्रीमान ना.ता.सगरे विद्यालय, हिंगणगांव (तांत्रिक विभागासह) | (0233) 226046 |
| टाकळी बोलवाड हायस्कूल, टाकळी. | (0233) 2258206 |
| श्रीमती सोनाबाई आण्णासो पाटील कन्या शाळा, कुपवाड. | (0233) 2346134 |
| तानंग हायस्कूल, तानंग. | (0233) 2276122 |
| मिरज महाविद्यालय, मिरज (कला, वाणिज्य व विज्ञान) आणि एम.सी.व्ही.सी. (वरिष्ठ विभाग व कनिष्ठ विभाग) | (0233) 2211919 |
| बालमंदिर, कुपवाड. | (0233) 2346134 |
| नवजीवन प्राथमिक शाळा, एम.आय.डी.सी.मिरज | (0233) 2346804 |
| मालती नेमिनाथ चौगुले कन्या शाळा व उच्च माध्यमिक विद्यालय, आरग. | (0233) 2264664 |

*अत्यंत महत्वाचे*
*परीक्षा प्राधान्य*

*विषय :-* माध्यमिक शालांत/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च, २००४ पासून शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या क्रमांकामध्ये तालुका/ब्लॉक/ वॉर्ड/झोन यांचा समावेश करून नवीन सांकेतिक क्रमांक दिलेबाबत.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४**

परिपत्रक क्रमांक कोविमं/शाखा-डीपी/मान्यता/नवीन सांकेतिक क्रमांक नोंदणीबाबत...

कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सांकेतीक क्रमांक (Index No.) देण्याची सद्याची पद्धत dd.sss. (dd - District Code, sss - School No.) अशी आहे. यामध्ये प्रथम दोन आकडे जिल्हा क्रमांक व पुढील तीन आकडे जिल्ह्यातील शाळा/कनिष्ठ महाविद्यालय क्रमांकासाठी आहेत.

यापद्धतीने संगणकीय दृष्ट्या एका जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळांना ९९९ पर्यंत क्रमांक देता येतो मात्र त्यापुढे क्रमांक देता येत नाही. तसेच काही जिल्ह्यातील शाळांचे क्रमांक ९९९ पेक्षा जास्त झाल्याने शाळांच्या क्रमांकात पुन:रचना करणे आवश्यक झाले आहे. त्याचप्रमाणे शासन स्तरावर काही वेळेस वेगवेगळ्या कामासाठी तालुकानिहाय माहिती हवी असते.

सबब वरील कारणास्तव व मंडळाच्या विभागीय व राज्यस्तरीय कामकाजामध्ये सुसूत्रता येण्यासाठी प्रचलित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे सांकेतीक क्रमांक बदलून नव्याने खालीलपद्धतीने नवीन सांकेतीक क्रमांक दिलेले आहेत. त्यामध्ये dd.tt.sss (dd- District Code, tt- Taluka/Block/Ward/Zone code, sss School No.) याचा समावेश केलेला आहे. याचा अर्थ dd म्हणजे जिल्हा क्रमांक, tt म्हणजे तालुका/ब्लॉक/क्रमांक व sss जिल्ह्यातील शाळा/क.म. क्रमांक असा आहे.

वरील पद्धतीनुसार आपल्या शाळेसाठी/कनिष्ठ महाविद्यालयाचा नवीन सुधारीत सांकेतीक क्रमांक (Index No.) खालीलप्रमाणे निश्चित केलेला आहे.

| पूर्वीचा सांकेतिक क्रमांक | नवीन सुधारीत सांकेतिक क्रमांक |
|---|---|
| 22.1.25 | 22.08.022 |

वरीलप्रमाणे बदलेल्या सांकेतील क्रमांकाची नोंद शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी घ्यावी. वर नमूद केल्याप्रमाणे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे क्रमांकामधील बदल फेब्रुवारी/मार्च २००४ च्या परीक्षांपासून अंमलात आणावयाचे असल्याने सदर परीक्षांची आवेदनपत्रे (Application Form) नवीन सांकेतील क्रमांक नोंद करून मंडळ कार्यालयाकडे पाठवावीत.

पेथून पुढे सर्व पत्रव्यवहारामध्ये व कागदपत्रांमध्ये नवीन सांकेतीक क्रमांकच नमूद करा. यामध्ये कोणतीही चूक राहणार नाही याची दक्षता मुख्याध्यापक/प्राचार्यांनी घ्यावी व त्याप्र आपल्या शाळेच्या/कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिलेखामध्ये दुरूस्ती करून घ्यावी.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर.

कोल्हापूर - ४१६ ००४.
दिनांक - १६-९-२००३

।। ज्ञानम् परम् दैवतम् ।।

**यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड) संचलित,**

# मिरज महाविद्यालय, मिरज.

**(कला, विज्ञान व वाणिज्य)**

**शासकीय दूध डेअरीशेजारी, बुधगांवकर मळा, मिरज.**

## कनिष्ठ विभाग

**प्रास्ताविक :**

'ज्ञानाचा दिवा' घरोघरी लावून, सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी सुसंस्काराचा झरा अखंड वाहत रहावा या उदात्त हेतूने महाराष्ट्र राज्य स्थापन वर्षात स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्यावरील अढळ निष्ठेने दि. २७ नोव्हेंबर १९६० रोजी सांगली येथे 'यशवंत शिक्षण संस्था, सांगली' या संस्थेची स्थापना थोर स्वातंत्र्य सैनिक कै. देशभक्त आर. पी. पाटील (आण्णा) यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने करण्यात आली. सामाजिक, राजकीय सहकार अशा बहुविध क्षेत्रात एक लोकमान्य, राज्यमान्य व स्वच्छ चारित्र्याची व्यक्ती म्हणून आर. पी. आण्णांनी ख्याती मिळविली. त्या पाठोपाठ ग्रामीण समाजाला शिक्षण देऊन त्याला खऱ्या अर्थाने साक्षर बनविण्याचे काम कर्मवीरांचा वारसदार म्हणून मा. आण्णांना शिक्षण क्षेत्रात पर्दापण केले आणि याही क्षेत्रात 'यशवंत' होण्यासाठी यशवंत शिक्षण संस्थेची स्थापना केली.

मा. आण्णांच्या कार्याचे चिरंतन व सजीव स्मारक म्हणजेच 'यशवंत शिक्षण संस्था' होय. आधुनिक काळात शिक्षणाचा वाढलेला प्रचंड व्याप व मिरज सारख्या शहरातील व आसपासच्या खेड्यातील विद्यार्थ्यांची गरज व अडचण ओळखून मिरजेचे कर्तव्यदक्ष, अभ्यासू माजी आमदार प्रा. शरद पाटील यांच्या पुढाकाराने मिरज महाविद्यालय, मिरज हे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय जून १९९३ पासून सुरु झालेले आहे. बुद्धिमान व नितीमान, चारित्र्यसंपन्न, सुदृढ नागरीक घडविणे व त्याद्वारे नवभारताच्या निर्मितीस हातभार लावणे हे या महाविद्यालयाचे अंगीकृत ध्येय आहे. गेल्या तेरा वर्षात या महाविद्यालयाने भरीव नेत्रदीपक यश संपादन केले आहे. मा. माजी आमदार शरद पाटील यांच्या प्रयत्नाने जून १९९९ पासून या महाविद्यालयामध्ये कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग सुरु करण्यात आले आहे. कनिष्ठ विभागाकडे जून २०११ पासुन एम.सी.व्ही.सी. विभाग सुरु करण्यात आलेला आहे.

**जून २०२३ मध्ये महाविद्यालय ३१ व्या वर्षात यशस्वी पदार्पण करीत आहे.** अगदी अल्पावधीत या महाविद्यालयाने स्वत:च्या जागेत एकूण ३२ खोल्यांची भव्य वास्तू शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी शासकीय दूध डेअरी शेजारी उभी आहे. ऑक्टोबर २०१९ मध्ये राष्ट्रीय मुल्यांकन आणि अधिस्विकृती परिषद, बेंगलोर अर्थात नॅक या संस्थेद्वारा महाविद्यालयाचे मूल्यांकन प्राप्त झाले. तसेच २० मार्च २००६ रोजी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून सेक्शन २ (एफ) आणि १२ (बी) च्या यादीत महाविद्यालयाचे नांव नोंदविले गेले. यामुळे महाविद्यालयाचा दर्जा वाढला असून उपरोक्त आयोगाकडून विविध शैक्षणिक उपक्रमासाठी अनुदान मिळण्यास महाविद्यालय अर्हताधारक झाले आहे.

**महाविद्यालयाची वेळ :**

कला व वाणिज्य विभागाचे वर्ग सकाळी ७.३० पासून तर विज्ञान विभागाचे वर्ग सकाळी ११.३० पासून सुरु होतात.

| | |
|---|---|
| **कार्यालयाची वेळ :** | **सकाळी १०.०० ते २.०० व दुपारी २.३० ते ६.००** |
| **आर्थिक व्यवहाराची वेळ :** | **सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.३० ते दुपारी १.३०** |
| | **(शनिवारी आर्थिक व्यवहार बंद राहतील.)** |

**प्रवेशासंबंधी :**

इ. ११ वी (एफ.वाय.जे.सी.) करिता सायन्स/आर्टस्/कॉमर्स शाखेकडे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नवीन अभ्यासक्रमानुसार एस.एस.सी. (इ. १० वी) किंवा तत्सम समकक्ष परीक्षा इंग्रजी हा विषय घेऊन विद्यार्थी उत्तीर्ण असला पाहिजे.

२) इ. ११ वी विज्ञान या वर्गात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांस इयत्ता १० वी च्या परीक्षेमध्ये शास्त्र विषयास किमान ३५% (३५/१००) गुण असणे आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेकडे अर्ज करु नयेत.

३) इ. ११ वी या वर्गात प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव शाळा सोडल्याचा मूळ दाखला परत दिला जाणार नाही.

४) प्रवेश घेतेवेळी पालकांनी पाल्यासोबत उपस्थित असावे.

५) विद्यार्थ्यांनी पत्ता व फोन नंबर बदल झाल्यास ताबडतोब कार्यालयास कळविणे बंधनकारक आहे.

६) CBSE अभ्यासक्रम पूर्ण करुन ११ वी प्रवेश घेताना शाळा सोडलेला दाखला व स्थलांतर (प्रमाणपत्र) (Migration Certificate) देणे आवश्यक आहे

७) इ. ११ वी कला शाखेत प्रवेश शिल्लक राहिल्यास **ATKT (Allowed to keep Terms)** प्रवेश दिला जाईल. त्याने त्याच शैक्षणिक वर्षात ऑक्टो. किंवा मार्च परीक्षेत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. जर विद्यार्थी ऑक्टो. व मार्चमध्ये अनुउत्तीर्ण झाल्यास त्या विद्यार्थ्याचा इ. ११ वीचा प्रवेश रद्द होईल. इ. ११ वी गुणपत्रक मिळणार नाही (टिप : ATKT प्रवेश हा तात्पुरता प्रवेश समजावा.)

**विद्यार्थ्यांनी इ. ११ वी मध्ये प्रवेश घेताना खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

◆ अ) एस. एस. सी. परीक्षेच्या गुणपत्रकाची मूळ प्रत व दोन झेरॉक्स सत्य प्रती.
ब) शाळा सोडल्याचा दाखला मूळ प्रत व दोन झेरॉक्स सत्य प्रती.
क) आयडेंटीटी साईजचे दोन फोटो (फोटो पांढऱ्या कपड्यातील असावेत) व ३ सें.मी. X २ सें.मी. साईजचा एक फोटो.
ड) मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा स्वत:चा जातीचा मूळ दाखला व दोन झेरॉक्स सत्य प्रती.
इ) अद्यायावत आधार कार्डची झेरॉक्स दोन प्रती (फोन नंबर व जन्मतारखेसह)
ई) स्वत:चे खाते असलेल्या किंवा वडीलांचे खाते असलेले राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुकच्या झेरॉक्स प्रत दोन

◆ **१२ वी करीता सायन्स / आर्टस्, कॉमर्स शाखेकडे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.**

१) या कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व इ. ११ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इ. १२ वीत प्रवेश घेतल्यानंतर जागा शिल्लक असल्यास बाहेरील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत विचार केला जाईल.

२) सामान्यपणे इ. ११ वी करीता निवडलेले विषय इ. १२ वी करीता ठेवावे लागतील.

३) विज्ञान शाखेतील इ. १२ वी मध्ये प्रवेश घेतेवेळी निवडलेला A व B किंवा AB ग्रुपमधील विषयामध्ये बदल करता येणार नाही.

**४) इ. १२ वी च्या प्रवेश अर्जासोबत खालील पत्रके जोडणे आवश्यक आहे.**

अ) इ. ११ वी च्या वार्षिक परीक्षेच्या गुणपत्रिकेची दोन झेरॉक्स सत्य प्रत.

ब) कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (बाहेरील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी)

क) आयडेंटीटी साईज दोन फोटो (फोटो पांढऱ्या कपड्यातील असावेत) व ३ सें.मी. X २ सें.मी. साईजचा एक फोटो

ड) सवलत प्राप्त विद्यार्थ्याचा जातीचा मूळ दाखला व झेरॉक्स प्रत. (मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा स्वत:चा जातीचा दाखला प्रत आवश्यक)

**महाराष्ट्र राज्याबाहेर / विभागीय मंडळाच्या बाहेरील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत :**

महाराष्ट्र राज्याबाहेरील मान्यताप्राप्त संस्था / शिक्षण मंडळ यांची शालांत किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या कनिष्ठ महाविद्यालयाच्या इ. ११ वी / इ. १२ वी साठी प्रवेश अर्ज सादर करताना त्यासोबत खालील प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) १० वी उत्तीर्ण परीक्षेच्या गुणपत्रकाची मूळ प्रत व दोन झेरॉक्स सत्य प्रती.

२) १० वी उत्तीर्ण परीक्षेच्या प्रमाणपत्राची मूळ प्रत व दोन झेरॉक्स सत्य प्रती.

३) मूळ स्थलांतर प्रमाणपत्र व दोन झेरॉक्स सत्य प्रती. ४) वर्तवणुक दाखला.

५) मूळ शाळा सोडल्याचा दाखला व दोन झेरॉक्स सत्य प्रती.

६) आयडेंटीटीसाठी व ३ सें.मी. X २ सें.मी. साईजचा एक फोटो.

७) विभागीय मंडळाच्या बाहेरील विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात प्रवेश घेताना आपला शाळा सोडलेल्या दाखल्याच्या मूळ प्रतीवर शिक्षणाधिकाऱ्यांची प्रति स्वाक्षरी (Counter Signature) आवश्यक आहे.

**जे विद्यार्थी वरील बाबींची पूर्तता मुदतीत करणार नाहीत. अशा विद्यार्थाने कोल्हापूर परीक्षा मंडळाकडूने कायम पात्रता प्रमाणपत्र जोपर्यंत येत नाही, तोपर्यंत त्यांचा तात्पुरता प्रवेश राहील व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने केलेल्या दंडात्मक कारवाईस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.**

८) तात्पुरता प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी दि. २० जानेवारी पर्यंत आपला मूळ बोर्डाकडून आलेल्या गुणपत्रिकाची छायांकीत प्रत ११वी प्रवेश (इतर बोर्डातील) विद्यार्थ्यांनी जमा करणे आवश्यक आहे.

◆ **शिकविण्याचे माध्यम :**

शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळविल्याप्रमाणे कला व वाणिज्य विषयासाठी शिकविण्याचे माध्यम मराठी व विज्ञानसाठी शिकविण्याचे माध्यम इंग्रजी राहील.

**❊ विषय निवडीबाबत :**

**कला विभाग :** (इ. ११ वी आणि १२ वी साठी)

**(Arts)**

**सक्तीचे विषय :** १) इंग्रजी (English)
२) मराठी (Marathi)
३) पर्यावरण शिक्षण (Environment Education)
४) शारीरिक शिक्षण (Physical Education)

**ऐच्छिक विषय :** १) हिंदी (Hindi)
२) अर्थशास्त्र (Economics)
३) भूगोल (Geography)
४) इतिहास (History)

**वाणिज्य विभाग :** (इ. ११ वी आणि १२ वी साठी)

**(Commerce)**

**सक्तीचे विषय :** १) इंग्रजी (English)
२) मराठी (Marathi) किंवा हिंदी (Hindi)
३) पर्यावरण शिक्षण (Environment Education)
४) शारीरिक शिक्षण (Physical Education)

**ऐच्छिक विषय :** **(Optional, Subjects)**
१) पुस्तकपालन व लेखाकर्म (Book-keeping and accountancy)
२) व्यापार संघटन व व्यवस्थापन (Organization of Commerce and Management)
३) अर्थशास्त्र (Economics)
४) चिटणीसाचा व्यवसाय (Secretarial Practice) किंवा सहकार (Co-operation)

**विज्ञान विभाग :** (इ. ११ वी आणि १२ वी साठी)

**(Science)**

**सक्तीचे विषय :** १) इंग्रजी (English)
२) मराठी किंवा हिंदी किंवा माहिती तंत्रज्ञान (Marathi OR Hindi OR I. T.)
३) पर्यावरण शिक्षण (Environment Education)
४) शारीरिक शिक्षण (Physical Education)

**ऐच्छिक विषय :**
१) भौतिकशास्त्र (Physics)

२) रसायनशास्त्र (Chemistry)

३) गणित व संख्याशास्त्र (Mathematics & Statistics)

४) जीवशास्त्र (Biology)

५) भूगोल (Geography) (इ. १२ वी साठी गणित किंवा जीवशास्त्रऐवजी घेता येईल)

६) इयत्ता १२ वी विज्ञान शाखेकडील विद्यार्थ्यांना भूगोल विषय इंग्रजी माध्यम (Geogrephy English Medium) मधून घ्यावयाचा असेल अशा विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर यांनी स्वयंअध्ययन म्हणून ५००/- रुपये शुल्क किंवा त्या शैक्षणिक वर्षात नेमून दिलेले शुल्क भरावे लागले याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**टीप :** १) पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयाचा प्रकल्पकार्य व सेमीनार /जर्नल कार्य करणे अनिवार्य आहे.

२) पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार काही विषयांचे प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा देणे अनिवार्य आहे.

३) शारिरीक शिक्षण या विषयाचा प्रकल्प, लेखी परीक्षा व मैदानी परीक्षा देणे अनिवार्य आहे.

**सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार पर्यावरण विषय अनिवार्य केला आहे. पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयात उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. जर विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याचा संपूर्ण निकाल अनुत्तीर्ण असा घोषित केला जाईल.**

## पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासुन पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा हा विषय कनिष्ट महाविद्यामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम व सर्व द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या विद्यर्थ्यांना अनिवार्य असुन ह्या विषयाची गुण विभागणी वार्षिक पध्दतीने करण्यात येईल.

प्रकल्प कार्यासाठी - ३० गुण

जर्नल / सेमिनार कार्य - २० गुण

एकूण = ५० गुण

१) प्राप्त गुणांचे A,B,C,D, या श्रेणीत रुपांतर करण्यात येईल, D श्रेणी अनुत्तीर्ण दर्शवेल.

२) इयत्ता ११ वी - १२ वी पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयासाठी अंतर्गत व बाह्य परीक्षकांकडून मुल्यमापन करण्यात येईल.

३) इयत्ता ११ वी साठी संबधित महाविद्यालयातील शिक्षक बाह्य व अंतर्गत परीक्षक म्हणून काम पाहातील व त्यांची नेमणूक महाविद्यालय स्तरावर होईल.

४) अंतर्गत परीक्षक व बाह्य परीक्षक यांच्या एकत्रित परीक्षणातून विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल जाहीर करण्यात येईल.

५) विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वी च्या पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयात ५० पैकी मिळालेल्या गुणाचे श्रेणीत रुपांतर करुन मिळलेली श्रेणी मंडळाकडे अधिकृत श्रेणी तक्त्यात सादर करण्यात येईल. या विषयाची लेखी परीक्षा नसली तरी प्रकल्प कार्य व सेमिनार/जर्नल कार्य यामध्ये ५० पैकी मिळालेल्या गुणांचे श्रेणीत रुपांतर करुन, मिळालेली श्रेणी गुणपत्रिकेत मंडळाकडून दर्शवण्यात येईल.

६**) इयत्ता ११ वी - १२ वी मध्ये उत्तीण होण्यासाठी 'पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा' या विषयात उत्तीण होणे अनिवार्य आहे.**

**७) पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विषयाची लेखी परीक्षा नसल्यामुळे या विषयाच्या बाबतीत पुर्नमुल्यांकन होणार नाही.**

**८) पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विषयास सवलतीचे गुण देय असणार नाहीत.**

९) विद्यार्थ्याला पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयास एकदा उत्तीर्ण झाल्यास, त्यास श्रेणी वाढीसाठी पुन्हा प्रविष्ठ व्हायचे असल्यास, त्यास प्रकल्प, जर्नल/सेमिनार कार्य पुनश्च नव्याने क रा वे लागेल.

१०) इयत्ता १२ वीच्या विद्यार्थांनी प्रकल्प कार्य अहवाल व जर्नल /सेमिनार कार्य बोर्डाकडून दिलेल्या प्रकल्प व जर्नल कार्यवहीतच पुर्ण करावे/लिहावेत.

## ❊ आरोग्य व शारीरिक शिक्षण ❊

**शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासुन**

'महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी आरोग्य व शारीरिक शिक्षण हा विषय कनिष्ठ महाविद्यालया मध्ये कला वाणिज्य, विज्ञान, उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम व सर्व व्दीलक्षी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अनिवार्य असुन ह्या विषयाची गुण विभागणी वार्षिक पद्धतीने करण्यात येईल.

लेखी परीक्षा – २५ गुण
प्रात्यक्षिक – २५ गुण
एकूण – ५० गुण

१) प्राप्त गुणाचे A, B, C, D, या श्रेणीत रुपांतर करण्यात येईल. D श्रेणी अनुत्तीर्ण दर्शवेल.

२) या दोन्ही परीक्षा व्दितीय सत्रात घेण्यात येतील.

३) लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा यांचे गुण एकत्रित करुन विद्यार्थ्यांना ५० पैकी मिळालेल्या गुणाचे श्रेणीक रुपांतर करुन विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल जाहीर करण्यात येईल.

४) विद्यार्थ्यांना इयत्ता १२वी च्या या विषयात ५० पैकी मिळालेल्या गुणाचे श्रेणीत रुपांतर करुन मंडळाने दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे गुणतक्ता मंडळाकडे सादर केला जाईल.

५) इयत्ता ११वी/१२वी मध्ये उर्त्तीर्ण होण्यासाठी आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयात उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

**महत्वाचे :**

१) इ.११वी व १२वी साठी प्रत्येक तुकडीसाठी आठवड्यातुन दोन तासिका आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयासाठी देण्यात आलेले आहेत. त्या नियमित वेळापत्रकाचे विद्यार्थर्यानी काटेकोर पालनकरुन अभ्यासक्रम पूर्ण करावा.

२) मुक–बधीर, अंध व अपंग विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक सोयीस्कर होतील अशा प्रकारे घेतले जातील किंवा मुलाखत घेतलीजाईल त्यावेळी प्राचार्यांचे मार्गदर्शन घेऊन निर्णय घेतला जाईल.

३) इ.११वी प्रमाणेच १२वी ला लेखी परीक्षेसाठी प्रश्नप्रकार सारखेच असतील. इ. ११वी व इ.१२वी प्रात्याक्षिक प्रकार वेगळे असतील.

**सरकारी शिष्यवृत्त्या व फी सवलती :**

भारत सरकार आणि राज्य सरकार यांच्याकडून मिळणाऱ्या सर्व शिष्यवृत्त्या व फी सवलती याचा फायदा या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळतो. प्रत्येक शिष्यवृत्ती व फी सवलतीना विशिष्ट अटी व मुदत असते.

यासंबंधी सरकारी निवेदने येतात, त्या सूचना फलकावर लावल्या जातात. अटीस पात्र ठरणार विद्यार्थ्यांनी मुदतीत व विहित नमुना अर्जात आवश्यक ती माहिती भरुन जरुर त्या कागदपत्रासह मुदतीत कार्यालयात सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. यासाठी विद्यार्थ्यांनी वेळोवेळी सूचना फलक पाहणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्ती व फी सवलती खालीलप्रमाणे :**

१) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती २) प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलांसाठी शिष्यवृत्त्या

३) राज्य गुणवत्ता शिष्यवृत्ती ४) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांसाठी शिष्यवृत्त्या व फी सवलती

५) सेना दलातील जवानांच्या मुलांसाठी फी सवलती

६) माजी सैनिकांच्या मुलांसाठी मिळणाऱ्या फी सवलती

७) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील (ई.बी.सी.) विद्यार्थ्यांसाठी फी सवलती व शिष्यवृत्त्या.

८) मागासलेल्या जाती जमातीतील विद्यार्थ्यांना (बी.सी.) मिळणाऱ्या फी सवलती व शिष्यवृत्त्या.

९) विद्यार्थिनींसाठी फी माफी कनिष्ठ महाविद्यालयीन गुणवत्ता शिष्यवृत्त्या फी सवलती.

१०) कनिष्ठ महाविद्यालयातील विविध वर्गात गुण संपादन केलेल्या विद्यार्थ्यांस विविध गुणवत्ता शिष्यवृत्त्या (Merit Scholarship) दिल्या जातात. तसेच गरीब, होतकरु आणि लायक विद्यार्थ्यांना नियमानुसार फी सवलती देण्यात येतात. यासंबंधीचे नियम व अटी व अन्य माहिती महाविद्यालयाच्या कार्यालयात मिळेल.

११) छत्रपती शाहू शिष्यवृत्ती.

**इ. ११ वी – कला, वाणिज्य आणि विज्ञान :**

इ. ११ वी ची वार्षिक परीक्षा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत घेतली जाते. या परीक्षेस बसण्यासाठी खालील अटी पूर्ण कराव्या लागतील.

१) प्रत्येक विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती किमान ८०% असणे आवश्यक आहे.

२) उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नियमानुसार ट्यूटोरियल्स, टेस्टस्, प्रॅक्टिकल, प्रकल्प वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे.

३) प्रत्येक विद्यार्थ्यांने चाचणी व प्रथमसत्र परीक्षेस हजर असणे आवश्यक आहे.

४) स्वाध्याय वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे.

५) शारीरिक शिक्षण विषयाची मैदानी परीक्षा देणे आवश्यक आहे.

इ. ११ वी ची वार्षिक परीक्षेचा निकाल लावताना ट्यूटोरियल्स व टेस्टमधील प्राप्त गुण अधिक सहामाही परीक्षेतील प्राप्त गुण अधिक वार्षिक परीक्षेतील प्राप्त गुण यांच्या सरासरी गुणावरुन गुणवत्ता ठरविली जाते व त्यानुसार निकाल तयार केला जातो.

**इ. १२ वी (कला, वाणिज्य व विज्ञान) परीक्षा :**

इ. १२ वी ची वार्षिक परीक्षा महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर यांचेमार्फत घेतली जाते. या परीक्षेत बसणेस पात्र होण्यासाठी खालील अटी पूर्ण कराव्या लागतील.

१) प्रत्येक विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती किमान ८०% असणे आवश्यक आहे. त्याशिवाय परीक्षा फॉर्म भरता येणार नाही.

२) उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नियमानुसार ट्यूटोरियल्स, टेस्टस्, प्रॅक्टिकल्स, प्रकल्प, क्षेत्र अहवाल नियोजित वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे.

३) पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयात उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. जर विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याचा संपूर्ण निकाल अनुत्तीर्ण असा घोषित केला जाईल.

४) आरोग्य व शारिरीक शिक्षण या विषयात प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा पास होणे आवश्यक आहे.

**क्रीडा व सांस्कृतिक विभाग :**

विविध खेळांमध्ये आमच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळवले आहे. तसेच राज्यस्तरीय पातळीवर सॉफ्ट बॉल व बास्केटबॉल प्राविण्य मिळविले आहे. सांस्कृतिक स्त्रोत एवं प्रशिक्षण केंद्र दिल्ली यांच्यावतीने सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन.

**ग्रंथालय :**

१)एकूण पुस्तकांची संख्या – २९९०५

२)ज्युनिअर विभागासाठी लागणाऱ्या संदर्भ ग्रंथांची व क्रमीक पुस्तकांची संख्या – ६३८६

३)व इतर स्पर्धा परीक्षेसाठी लागणाऱ्या पुस्तकांची सोय ग्रंथालयात उपलब्ध आहे.

४)ग्रंथालयाची वेळ सकाळी ८.३० ते सायं. ६.०० आणि ग्रंथ देवघेव वेळ सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० अशी राहील.

**वसतीगृह :**

१) माफक फीमध्ये मुलींसाठी वसतीगृहाची व भोजनाची सोय.

**शिस्त :**

१) प्रत्येक विद्यार्थ्यांने महाविद्यालयातील सर्व व्याख्यानांना नियमित व वेळेवर उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

२) व्याख्यान सुरु असताना वर्गामध्ये गोंगाट करणे, अन्य उपद्रवकारक हालचाली करणे किंवा व्हरांड्यात रेंगाळणे या बाबी शिस्तभंगाच्या असल्याने त्यांची गंभीर दखल घेतली जाईल. आपल्या वर्गाचा तास नसेल तर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या व्हरांड्यात रेंगाळू नये. ग्रंथालयात किंवा जिमखाना विभागात जाणेचे आहे.

३) या महाविद्यालयातील शिक्षक व प्रशासकीय सेवक यांच्याशी विद्यार्थ्यांनी सहकार्याने आणि सौजन्याने वागावे.

४) या महाविद्यालयाशी संबंधित नसणाऱ्या मित्र मैत्रिणींना, विद्यार्थी–विद्यार्थिनींना महाविद्यालयाच्या आवारात आपल्या सोबत आणू नये.

५) प्राचार्यांच्या लेखी अनुमतीशिवाय विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या परिसरात कोणतीही सभा, व्याख्याने किंवा अन्य कार्यक्रम आयोजित करता येणार नाहीत आणि संघटना स्थापन करता येणार नाही.

६) जिमखान्यातील साहित्य, ग्रंथालयातील पुस्तके व अन्य अभ्याससामुग्री महाविद्यालयातील फर्निचर आणि इतर मालमत्तेला एखाद्या विद्यार्थ्यांकडून नुकसान पोहोचल्यास त्याची भरपाई आणि शासन याबद्दल सदर विद्यार्थी आणि त्याचे पालक यांना जबाबदार धरण्यात येईल.

७) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासून आठ दिवसाच्या आत प्रत्येक विद्यार्थी / विद्यार्थिनीने आपले ओळखपत्र तयार करुन घेतले पाहिजे. सदरचे ओळखपत्र विद्यार्थ्याने / विद्यार्थिनीने महाविद्यालयाच्या आवारात असताना जवळ बाळगणे आवश्यक आहे. ओळखपत्राशिवाय एखादा विद्यार्थी / विद्यार्थिनी महाविद्यालयाच्या आवारात फिरताना आढळून आल्यास त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

८) महाविद्यालयामध्ये अगर महाविद्यालयाच्या बाहेर महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेस बाधा आणणारे वर्तन विद्यार्थ्याने करता कामा नये.

९) ज्या विद्यार्थ्यांना कॅरेक्टर सर्टिफिकेट, बोनाफाईड, बोर्ड सर्टिफिकेट, शाळा सोडलेला दाखला, पासिंग सर्टिफिकेट, लिव्हींग सर्टिफिकेट मॅग्रेशन सर्टिफिकेट वगैरे दाखले पाहिजे असतील, त्यांनी त्यासाठीचा अर्ज योग्य त्या शुल्कासहित कार्यालयात किमान तीन दिवस आधी केला पाहिजे.

१०) या महाविद्यालयाची शिस्त व त्यासंबंधीच्या नियमांचे उल्लंघन करुन बेशिस्त आणि बेजबाबदार वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांविरुद्ध आवश्यक ती कडक कारवाई केली जाईल. त्यामुळे होणाऱ्या नुकसानीस केवळ विद्यार्थीच जबाबदार राहील.

११) वर उल्लेख केलेले आणि यापुढे वेळोवेळी करण्यात येणारे विशेष नियम हे या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला बंधनकारक असून ते प्रत्येक विद्यार्थ्यास व त्याच्या पालकास मान्य आहेत असे गृहित धरण्यात आलेले आहे.

१२) खासगी शिकवणीला जाण्यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्गातील उपस्थितीवर परिणाम होऊन बेशिस्त निर्माण होत असेल तर त्यास पालक जबाबदार राहतील याबाबत पालकांना घरी सूचनापत्र पाठविले जाईल.

१३) परीक्षा फॉर्म भरताना प्रवेश अर्जावरील विषय परीक्षा फॉर्ममध्ये भरावेत अन्यथा बोर्डाकडून होणारा दंड भरावा लागेल.

१४) शासनाकडून वाढीव फी आकारण्यात आली तर सदरची वाढीव फी भरावी लागेल.

१५) महाविद्यालयाच्या कोणत्याही भिंती, बेंच किंवा ग्रंथालयातील पुस्तके यावर कसलेही लिखाण करु नये, तसे आढळून आल्यास जबर दंड आकारला जाईल.

१६) विद्यापीठ अनुदान आयोग व सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक संस्थांमध्ये घडणाऱ्या रॅगिंगला आळा घालण्यासाठी कायदा करण्यात आला आहे. रॅगिंगमध्ये सहभागी असणाऱ्या संबंधितांवर कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई केली जाईल.

१७) या महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनासाठी विद्यार्थ्यांना आग्रह धरता येणार नाही.

१८) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पी. आर. ई. २००९/प्र.क्र. ८९/१ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई दि. १८ फेब्रुवारी २००९ निर्णयानुसार महाविद्यालयाच्या आवारामध्ये व वर्गामध्ये मोबाईल फोन (भ्रमणध्वनी) वापरु नये. मोबाईल वापरताना आढळल्यास रु. ५०/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल व शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

१९) शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले खाते बँक ऑफ इंडिया, मिरज किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत उघडणे आवश्यक आहे.

२०) ''विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा गणवेश वापरणे बंधनकारक आहे.''

२१) विद्यार्थ्यांसाठी नाममात्र शुल्क आकारुन सायकल व दुचाकी वाहनांच्या पार्किंगची सोय करण्यात आली आहे.

२२) महाविद्यालयात प्रवेश करताना बुरखा, रुमाल, मास्क इ. यांनी तोंड झाकून येणाऱ्याला प्रवेश दिला जाणार नाही. मात्र नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्यास उदा. कोव्हीड-१९ (कोरोना) सारखा संसर्गजन्य रोगाचा प्रसार होत असेल तर मास्क व सॅनिटॅझरचा वापर करणे बंधनकारक राहील शासनाने घालुन दिलेल्या नियमांचे पालन करावे लागेल अन्यता नियमभंग करणाऱ्यावर कडक कार्यवाही केले जाइल. इ. ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला महाविद्यालयाने निश्चित केलेला गणवेश घेणे बंधनकारक आहे. गणवेश नसेल तर वर्गामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. शिस्तभंग केल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

**२३) खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी इ.बी.सी. फॉर्म तसेच मागासवर्गीय शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी** (online) **फॉर्म भरणे बंधनकारक आहे. अन्यथा शिक्षण शुल्क भरणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.**

२४) १) ६ जून -शिवस्वराज्य दिन
२) २६ जून - राजर्षि छ. शाहू महाराज जयंती
३) २३ जुलै -लोकमान्य टिळक जयंती
४) १ ऑगस्ट -अण्णाभाऊ साठे जयंती
५) १५ ऑगस्ट- स्वातंत्र्य दिन
६) २ ऑक्टो.- महात्मा गांधी जयती
७) ३१ ऑक्टो. - सरदार पटेल जयंती
८) ३० नोव्हे.- गुरुनानक जयंती
९) ३ जाने- सावित्री फुले जयंती
१०)१२ जाने - राष्ट्रमाता जिजाऊ जयंती स्वामी विवेकानंद जयंती
११) २६ जानेवारी- प्रजास्ताक दिन
१२) १९ फेब्रु - छ. शिवाजी महाराज जयंती
१३) ६ एप्रिल- भ. महावीर जयंती
१४) ११ एप्रिल - महात्मा जोतीबा फुले जयंती
१५) १४ एप्रिल - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती
१६) १ मे- महाराष्ट्र दिन या कार्यक्रमास सर्व विद्यार्थ्यानी उपस्थीत राहणे बंधन कारक आहे.

२५) वर्गात नियमित उपस्थित राहणे सक्तीचे आहे. (Compulsory Regular Attendance)

२६) एखाद्या दिवशी गैरहजर राहिल्यास पालकांनी प्रत्यक्ष येऊन भेटल्याशिवाय वर्गात बसू दिले जाणार.

**२७) पालकांना भेटायला सांगितले असता, त्वरीत पालकांनी संबंधीत शिक्षकांना भेटणे आवश्यक आहे.**

२८) वर्गात वेळेत येणे आवश्यक आहे. उशीर येणाऱ्यांना वर्गात बसू दिले जात नाही.

२९) वर्ग सुटल्यानंतर ताबडतोब घरी जायचे आहे. गप्पा मारत टाईमपास करणाऱ्यांना आमचेकडे प्रवेश नाही.

३०) आपली वाहने व सायकली स्वत:च्या जबाबदारीवर इतरांना अडचण होणार नाही अशा पद्धतीने लावावीत.

३१) वाहन/सायकल चोरीस गेल्यास महाविद्यालय जबाबदार असणार नाही. वाहन स्वत:च्या जबाबदारीवर आणावे.

# शिक्षण शुल्क तक्ता

**इ.बी.सी. व शिष्यवृत्ती सवलत धारकांनी संपूर्ण वर्षाची फी खालीलप्रमाणे प्रवेश घेतेवेळी भरावी.**

| तपशील | ११ वी कला/ वाणिज्य फी | १२ वी कला/ वाणिज्य फी | ११ वी विज्ञान फी | १२ वी विज्ञान फी |
|---|---|---|---|---|
| एस. ए. फंड | २०/- | २०/- | २०/- | २०/- |
| मॅगेझीन फी | ८०/- | ८०/- | ८०/- | ८०/- |
| ओळखपत्र | ५०/- | ५०/- | ५०/- | ५०/- |
| कॉलेज परीक्षा | ३५०/- | ३५०/- | ३५०/- | ३५०/- |
| ग्रंथालय फी | १८०/- | १८०/- | १८०/- | १८०/- |
| जिमखाना फी | १००/- | १००/- | १००/- | १००/- |
| विकास निधी | २००/- | २००/- | २००/- | २००/- |
| असोशिएशन फी | २०/- | २०/- | २०/- | २०/- |
| डाटा एंट्री प्रोसेसिंग फी | १००/- | १००/- | १००/- | १००/- |
| **एकूण** | **११००/-** | **११००/-** | **११००/-** | **११००/-** |

| तपशील | ११ वी कला/ वाणिज्य फी | १२ वी कला/ वाणिज्य फी | ११ वी विज्ञान फी | १२ वी विज्ञान फी |
|---|---|---|---|---|
| प्रवेश फी | १६/- | १८/- | १६/- | १८/- |
| शैक्षणिक फी | १९२/- | २१६/- | १९२/- | २१६/- |
| सत्र फी | ३२/- | ३६/- | ३२/- | ३६/- |
| प्रयोगशाळा फी | --- | --- | ७०/- | ७०/- |
| एस. ए. फंड | २०/- | २०/- | २०/- | २०/- |
| मॅगेझीन फी | ८०/- | ८०/- | ८०/- | ८०/- |
| ओळखपत्र | ५०/- | ५०/- | ५०/- | ५०/- |
| कॉलेज परीक्षा | ३५०/- | ३५०/- | ३५०/- | ३५०/- |
| ग्रंथालय फी | १८०/- | १८०/- | १८०/- | १८०/- |
| जिमखाना फी | १००/- | १००/- | १००/- | १००/- |
| विकास निधी | २००/- | २००/- | २००/- | २००/- |
| असोशिएशन फी | २०/- | २०/- | २०/- | २०/- |
| डाटा एंट्री प्रोसेसिंग फी | १००/- | १००/- | १००/- | १००/- |
| **एकूण** | **१३४०/-** | **१३७०/-** | **१४१०/-** | **१४४०/-** |

**माहिती आणि तंत्रज्ञान या विषयासाठी खालीलप्रमाणे फी राहील. (इ. ११ वी व १२ वी विज्ञानसाठी)**

१) आय. टी. फी रु. ४,०००/-

२) विना अनुदानित फी रु. कला रु. १५००/- वाणिज्य रु. ३०००/- व विज्ञान रु. ७०००/-

परराज्यातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्थलांतर दाखला (Migration) पात्रता फी रु. ७००/- भरणे आवश्यक आहे.

।। ज्ञानम् परम् दैवतम् ।।

यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड) संचलित,

# मिरज महाविद्यालय, मिरज.

(कला, विज्ञान व वाणिज्य)

**शासकीय दूध डेअरीशेजारी, बुधगांवकर मळा, मिरज.**

## हमी पत्र

मी श्री./कु. ____________________

वर्ग शैक्षणिक वर्ष २० / २० मध्ये आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छितो / इच्छिते. माझी जर वर्गातील उपस्थिती ठरवून दिलेल्या म्हणजेच एकूण कामकाजांच्या १८० दिवसांपैकी ८० टक्के प्रमाणात भरली नाही तर महाविद्यालय / बोर्ड परीक्षेस बसण्यात मला अपात्र ठरविले जाईल याची मला माहिती असून असे घडल्यास त्या संदर्भात माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

महाविद्यालयाच्या नियमानुसार चाचणी परीक्षा, सहामाही परीक्षा इ. अंतर्गत परीक्षांना माझा पाल्य उपस्थित राहील. विद्यार्थ्यांनी सतत अभ्यासात राहून वार्षिक परीक्षेत चांगले गुण मिळविणेसाठी अंतर्गत परीक्षांचा उपयोग चांगला होतो हे मला मान्य आहे. तसेच माझा पाल्य उपरोक्त सर्व परीक्षांना गैरहजर राहिला किंवा परीक्षेस उपस्थित राहून नापास झाला तर महाविद्यालय जो दंड आकारेल तो दंड भरण्यास आमची कोणतीही तक्रार असणार नाही. तसेच आपल्या महाविद्यालयात स्नेहसंमेलन होत नाही. त्याऐवजी एक दिवसाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ होईल. याची मला कल्पना आहे.

**विद्यार्थीची सही** **आई/वडील/पालकची सही**

**उपप्राचार्य/पर्यवेक्षक** **प्राचार्य**

* हा फॉर्म इंग्रजीमध्ये सुवाच्छ अक्षरात भरा.
* प्रवेश फी जमा करतेवेळी हा फॉर्म कॅशियर यांचेकडे जमा करावा.
* ज्या वर्गात प्रवेश हवा आहे त्यासंबंधी माहिती लिहा.
* रोल नंबर कॅशियर लिहतील.

**Miraj Mahavidyalaya, Miraj**

फोटो डिंकाने चिकटवावा.
स्टेपलर पीन मारु नका.

photo

Signature

Name of Student :______________________________

(Surname) (Name) (Father's Name)

Class : ____________________ Roll No. :____________________

Date of Birth : ____________________ Contact No. : ____________________

Address :______________________________

______________________________

College PAN No. MMM/20 .......................

# प्रवेश अर्ज

सूचना : लागू असलेल्या चौकटीसमोर ✓ अशी खूण करा. (अनुदानित/विनाअनुदानित)

**फोटो**

| फ्रेश | रिपिटर | इयत्ता ११ वी इयत्ता १२ वी | वर्ग | खुली | राखीव |
|---|---|---|---|---|---|
| | | | कला | | |
| | | | विज्ञान | | |
| | | | वाणिज्य | | |

**मागास जाती /जमाती प्रकार**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. जाती | | अ. जाती जमाती | | वि. जाती | |
| भ. जाती | | इ. मा. व. | | वि. मा. प्र. | |

**मागास जातीचा प्रकार**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्राथ. शि. स. | | मागास / संवर्ग | | एसईबीसी | |
| माध्य./उच्च शि. स. | | आर्थिक मा. संवर्ग | | मुलीसाठी स. | |
| स्वा सै. स. | | सै. संवर्ग | | फी भरणारे | |

प्रवेश क्र. ______ PAN No. MMM/20

**प्रति,**

**मा. प्राचार्य, मिरज महाविद्यालय, मिरज.**

**महोदय,**

मी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २० / २० साठी

| इ. ११ वी | इ. १२ वी | कला | विज्ञान | वाणिज्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |

या वर्गात प्रवेश घेऊ इच्छितो / इच्छिते.

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो/करते की, या अर्जामध्ये भरलेली सर्व माहिती सत्य आणि बरोबर आहे. महाविद्यालयाच्या माहितीपत्रकामध्ये दिलेले आणि वेळोवेळी करण्यात येणारे नियम हे मला मान्य व बंधनकारक आहेत. या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करीन अशी मी हमी देतो/देते.

**ठिकाण –** **आपला / आपली विश्वासू**

**तारीख –** **अर्जदाराची सही**

---

**(अर्जदाराने भरावयाची माहिती)**

(आडनांव) (नांव) (वडिलांचे नांव) (आईचे नांव)

१) संपूर्ण नांव ______

इंग्रजीमध्ये नांव (कॅपीटल) ______

२) जन्म ठिकाण ______ तालुका ______ जिल्हा ______

३) जन्म तारीख ______ सध्याचे वय ______ वर्ष ४) पुरुष / स्त्री ५) विवाहित / अविवाहित

६) मातृभाषा ______ धर्म ______ जात ______ पोटजात ______

७) कायमचा पत्ता ______

______ पालकांचा मो.नं. ______

८) स्थानिक पत्ता ______

९) आधार कार्ड क्र. ______ आधार लिंक मो.नं. ______

१०) पालकांशी नाते : मुलगा / मुलगी / पाल्य ११) विद्यार्थी सरल क्र. ______

१२) महाविद्यालयाच्या माहितीपत्राकमध्ये दिलेल्या सूचनांनुसार मी खालील विषय घेऊ इच्छितो/इच्छिते.

(इ. ११ वी व १२ वी मध्ये घ्यावयाचे विषय व माध्यम लिहावेत.)

अ) सक्तीचे : १) इंग्रजी २) पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा ३) आरोग्य व भशारीरिक शिक्षण ४) मराठी/हिंदी/माहिती तंत्रज्ञान (विज्ञान व वाणिज्य शाखेस)

ब) ऐच्छिक : १) २) ३) ४)

---

पोहोच पावती

# मिरज महाविद्यालय, मिरज.

| परीक्षेचे नांव | मंडळाचे / महाविद्यालयाचे नांव | परीक्षा बैठक क्रमांक | महिना व वर्ष (उत्तीर्ण परीक्षा) | मिळविलेले एकूण गुण | गुणांची टक्केवारी | इ. १० वी च्या परीक्षेत विज्ञान विषयात मिळालेले गुण व टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता १० वी अथवा तत्सम | | | | —— | | |
| इयत्ता ११ वी | | | | /६०० | | /१०० |
| इयत्ता १२ वी | | | | /६०० | | |

१३) इयत्ता १० वी / ११ वी / १२ वी मध्ये घेतलेले विषय व गुण.

१) ________ २) ________ ३) ________ ४) ________

५) ________ ६) ________ ७) ________ ८) ________

१४) यापूर्वी शिकत असलेल्या शाळेचे / महाविद्यालयाचे नांव ________

________ वर्ग ________ वर्ष ________ पट क्रमांक ________

१५) अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे : १) शाळा सोडल्याचा दाखला(मूळप्रत आणि दोन सत्य प्रती) २) इ. १० वी ची गुणपत्रिका (दोन सत्यप्रती)३) संस्थांतर / स्थलांतर दाखला (मूळप्रत आणि दोन सत्य प्रती) ४) इ. ११ वी ची गुणपत्रिका (दोन सत्य प्रती) ५) इ. १२वी ची गुणपत्रिका (पूर्नपरीक्षार्थी मूळप्रत आणि दोन सत्य प्रती) ६) ओळखपत्रासाठी दोन फोटो (फोटो पांढऱ्या कपड्यातील असावेत)७) आधार कार्ड (दोन सत्य प्रती) ८) जातीचा दाखला (दोन सत्य प्रती)

---

**(पालकांनी भरावयाची माहिती)**

१) पालकांचे संपूर्ण नांव ________
(आडनांव प्रथम)

२) व्यवसाय ________ ठिकाण ________

३) वार्षिक उत्पन्न ________ विद्यार्थ्यांशी / विद्यार्थिनीशी नाते : आई/वडील/पालक

४) पत्रव्यवहारासाठी पत्ता : ________

________ पालकांचा मो. नं. | | | | | | | | | | |

महाविद्यालयाचे माहितीपत्रक आणि त्यामधील सर्व नियम मी वाचलेले आहेत. मला ते सर्व नियम मान्य आहेत आणि ते नियम माझ्या पाल्यास बंधनकारक असून पाल्य या नियमांचे काटेकोरपणे पालन करेल तसेच **या महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेह संमेलन साजरे केले जाणार नाही हे महाविद्यालयाने माझ्या निदर्शनास आणले आहे. माझा पाल्य स्नेहसंमेलन साजरे करण्याविषयी कोणत्याही प्रकारचा आग्रह धरणार नाही व महाविद्यालयाचा गणवेश बंधनकारक राहिल याची मी हमी देतो** हे हमीपत्र माझ्यावर व माझ्या पाल्यावर बंधनकारक आहे.

**आपला / आपली विश्वासू**

**ठिकाण –**

**दिनांक –** **पालकांची सही**

---

**कार्यालयीन शेरा**

**१) प्रतिक्षा यादीवर ठेवला.**

**२)**

| इ. ११ वी | इ. १२ वी | कला | विज्ञान | वाणिज्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |

वर्गात

| तात्पुरता | कायमचा |
|---|---|
| | |

प्रवेश दिला

**दिनांक** **तपासणाऱ्याची सही** **पर्यवेक्षक / उपप्राचार्य** **प्राचार्य**

यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड) संचलित

# मिरज महाविद्यालय, मिरज.

## (कला, वाणिज्य व विज्ञान)

शासकीय दूध डेअरी शेजारी, ७९५/अ, बुधगांवकर मळा, मिरज ४१६ ४१०.

दूरध्वनी : (०२३३) २२११९१९.

## यशवंत एज्युकेअर

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी यशवंत शिक्षण संस्थेने सुरु केलेला एक अभिनव उपक्रम यशवंत एज्युकेअर या नांवाने राबविला जातो.

### ✲ वैशिष्ट्ये ✲

✲ सर्व विषयांची तयारी एकाच ठिकाणी केली जाते.

✲ सर्व विषयांना सारखेच महत्व देऊन दररोज तासिकांचे नियोजन.

✲ प्रात्यक्षिकांची स्वतंत्र सोय केली जाते.

✲ महाविद्यालयातच विद्यार्थ्यांचा अभ्यास करुन घेतला जातो.

✲ MHT-CET, JEE (Mail) NEET व इतर प्रवेश परीक्षा व स्पर्धा परीक्षेची तयारी ११ वी पासूनच केली जाते.

✲ उपस्थितीबाबत पालकांना माहिती देऊन चर्चा केली जाते.

✲ सर्व विषयांचे तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग.

✲ प्रत्येक आठवड्याला Topic Wise Test नियोजन.

✲ सर्व सोईंनीयुक्त निसर्गरम्य वातावरण व स्वतंत्र वर्ग खोली.

✲ स्वअध्ययनासाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था.

डॉ. ए. आर. जाधव

प्राचार्य

यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड) संचलित

# मिरज महाविद्यालय, मिरज.

## (कला, वाणिज्य व विज्ञान)

शासकीय दूध डेअरी शेजारी, ७९५/अ, बुधगांवकर मळा, मिरज ४१६ ४१०.

दूरध्वनी : (०२३३) २२११९१९.

### * महाविद्यालयाची वैशिष्ट्ये *

- २०१९ मध्ये नॅक द्वारा 'बी' मानांकन प्राप्त.
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग.
- सुसज्य व स्वतंत्र प्रयोगशाळा.
- उत्कृष्ठ निकालांची परंपरा.
- सर्व सोयींनीयुक्त निसर्गरम्य वातावरण व स्वतःची इमारत.
- समृद्ध ग्रंथालय व अभ्यासिका.
- सर्व सोयीयुक्त मुलींचे वसतीगृह.
- १२ वी बोर्ड परिक्षेमध्ये अधिक गुणवत्तेसाठी टेस्ट सिरीज उपक्रम.
- सर्व खेळांची सोय, भव्य क्रिडांगण, अद्यावत जीम.
- मध्यवर्ती बसस्थानक मिरज, मिरज मिशन हॉस्पिटल व सांगली-मिरज रोडपासून अगदी जवळ.
- विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांच्या मान्यतेने खालील करीअर ओरिएंटेड कोर्सेस सुरु आहेत. त्यांचा विद्यार्थ्यांना समांतर लाभ घेता येईल.

1) Certificate Course in Communication Skill in English
2) Certificate Course in Biotechnology
3) Career and Councilling cell
4) COC in Hospital & Waste Management
5) COC in Information Technology
6) COC in Plant Tissue Culture
7) COC in Applied Psychology

**पदवीसाठी विशेष स्तरावरील खालील विषयांची सोय**

- कला : मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, इतिहास, मानसशास्त्र
- विज्ञान : पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र व संगणकशास्त्र

तसेच २००७-२००८ पासून बी.सी.ए. हा अदयावत सोयींनीयुक्त नवीन कोर्स सुरु झालेला आहे. या कोर्ससाठी १२ कला, विज्ञान व वाणिज्य M.C.V.C. शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेनंतर गुणानुक्रमे प्रवेश दिला जाईल.

**इयत्ता ११ वी M.C.V.C. विभागाकडे इलेक्ट्रॅनिक्स टेक्नॉलॉजीसाठी प्रवेश सुरु.**

प्रवेशासाठी माहितीपत्रक व प्रवेश अर्ज महाविद्यालयात सकाळी १०.३० ते २ या वेळेत उपलब्ध इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधून प्रवेश निश्चित करावा.

डॉ. ए. आर. जाधव

प्राचार्य